

# मुकुल माधव विद्यालयाचे दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत मुकुल माधव विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. दहावीची परीक्षा देणारी विद्यालयाची ही पहिलीच तुकडी होती. एकूण २६ विद्यार्थ्यांनी या परीक्षेमध्ये उत्तम यश संपादन केले. २६ पैकी १९ विद्यार्थ्यांनी ७५% पेक्षा जास्त गुण प्राप्त करून विशेष श्रेणी प्राप्त केली. उर्वरित सात विद्यार्थ्यांना ६४% ते ७३% यादरम्यान गुण प्राप्त झाले. मुकुल माधव विद्यालयाची ही पहिलीच तुकडी असल्याने वर्षाच्या सुरुवातीपासूनच विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन करण्यात येत होते. अभ्यासाबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मुकुल माधव विद्यालयतर्फे विशेष लक्ष देण्यात आले होते.

> आमचे विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि मुकुल माधव विद्यालयाचा संपूर्ण कर्मचारी वृंद यांमुळे आम्हाला आज अभिमानाचा क्षण अनुभवता येत आहे. खरेतर आमची शाळा फक्त ११ वर्षांपूर्वी सुरु झाली आणि यादरम्यान अनेक संकटांना सामोरे जावे लागले. परंतु समाजाला जास्तीत जास्त चांगले देण्याचा आमचा प्रयत्न सफल झाला आहे. विद्यार्थ्यांनी घेतलेल्या परिश्रमाबद्दल कौतुक करून त्यांना आनंदी आरोग्यदायी भविष्यासाठी शुभेच्छा देते.
>
> \- रितू छाब्रिया, विश्वस्त व्यवस्थापक
> मुकुल माधव फाऊंडेशन